ला. प्र. वि.

**पोलीस उप अधीक्षक कार्यालय,**

**अँन्टी करप्शन ब्युरो, जालना**

दुरध्वनी कमांक ०२४८२ –२२०२५२टोल फ्री कमांक –१०६४

dysp.acbjalna@mahapolice.gov.in, dyspacbjalana@gmail.com


**प्रेस नोट** दि. ११.०४.२०२४

**महानगरपालीका जालना येथील वसुली लिपीकास ३०,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले.**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव | – | उत्तम शंकरराव लाडाने, वय ५४ वर्ष व्यवसाय नोकरी – सफाई कामगार, पदभार – वसुली लिपीक, महानगरपालिका, जालना रा. इन्कमटॅक्स कॉलनी, म्हाडा कॉलनी, जालना ( वर्ग – ४ ) |
| गुन्हा घ ता वेळ ठिकाण | – | दि. १०.०४.२०२४ रोजी ग्लोबस मेडीकल, गांधी चमनजवळ, जालना येथे. |
| **लाचेची रक्कम** | – | ३०,००० रुपये. |

तक्रारदार यांना महानगर पालिका, जालना यांचेकडुन दि. ०१.०४.२०१८ ते दि. ३१.०३.२०२४ या वर्षाचे मालमत्ता कर म्हणुन १,२४,५९६ रुपये भरणेबाबत नोटीस मिळाली होती, त्यावरुन आलोसे उत्तम लाडाने यांनी त्यांचेकडे जावुन वसुलीबाबत विचारणा करता तक्रारदार यांनी दि. ०५.०४.२०२४ रोजी ४१,५३२ रुपयांचा चेक आलोसे लाडाने यांना दिला असता त्यांनी तक्रारदार यांना ही रक्कम भरल्यानंतरही तुमच्याकडे बाकी राहीलेले ८३,००० रुपये मालमत्ता कर तुम्ही भरु नका, त्याऐवजी मला ४०,००० रुपये दया, मी तुमचा सर्व कर नील करुन देतो, असे म्हणुन तक्रारदार यांना ४०,००० रुपये लाचेची मागणी करुन १०,००० रुपये रक्कम तक्रारदार यांचेकडुन लगेच स्विकारली, त्यानंतर पुन्हा राहीलेले ३०,००० रुपये लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे केली, परंतु तक्रारदार यांची आलोसेला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तक्रार केली.

सदर तक्रारीवरुन दिनांक १०.०४.२०२४ रोजी लाच मागणीबाबत पडताळणी केली असता आलोसे उत्तम लाडाने याने तक्रारदार यांना त्यांचे मालमत्ता कर नील करुन देण्यासाठी पंचासमक्ष ३०,००० रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले. त्यावरुन दि. १०.०४.२०२४ रोजी सापळा लावला असता आलोसे उत्तम लाडाने यास तक्रारदार यांचेकडुन त्यांचे मालमत्ता कर नील करुन देण्यासाठी पंचासमक्ष राहीलेले ३०,००० रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेसह अँन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

आलोसे नामे उत्तम शंकरराव लाडाने, वय ५४ वर्ष व्यवसाय नोकरी – सफाई कामगार, पदभार – वसुली लिपीक, महानगरपालिका, जालना रा. इन्कमटॅक्स कॉलनी, म्हाडा कॉलनी, जालना ( वर्ग – ४ ) यांचेविरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना जि जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो,** जालना यांचे कडुन आवाहन करण्यात येते कि, कोणी लोकसेवक **स्वत अगर इतरांमार्फत शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खासगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२ – २२०२५२, तसेच टोल फ्री कं १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.९०१११२५५५३ व dysp.acbjalna@mahapolice.gov.in आणि dyspacbjalana @gmail.com वर संपर्क करावा.**

(किरण एम. बिडवे)
पोलीस उप-अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, जालना